ललिता गंडभीर
Lalita Gandbhir.
4200 North Ocean Drive.
1501-2
Riviera Beach, FL. 33504.
U. S. A.

# सुवर्णमध्य - भाग ४

दुसऱ्या दिवशी सकाळी मॉनिका नेहमीप्रमाणे आली. तिने हळूहळू मला तिच्या घरची सर्व हकीकत सांगितली,

“माझे पणजोबा प्रथम अगदी कफल्लक परिस्थितीत इंग्लंडहून अमेरिकेला आले. त्यांनी सुरु केलेला धंदा माझ्या आजोबांनी भरभराटीला आणला. नंतर आजोबांनी मूळ धंद्याबरोबर हॉटेल, तयार कपडे, जमिनी इ. इ. अनेक धंदेही सुरु केले. सगळीकडेच त्यांची भरभराट होत गेली. अमाप पैसा मिळाला.” मॉनिका थोडा वेळ अंतराळात बघत थांबली आणि पुन्हा बोलू लागली,

“आजोबांना एकच मुलगा होता. तेच माझे वडील. लहानपणी ते खूप आजारी होते. आजीने त्यांना अशक्त अशक्त असं म्हणून अगदी नजरकैदेतच असल्याप्रमाणे वाढवलं. शाळेत न पाठवता टयूटर घरी बोलावले. आजोबांना त्यांच्याकडे लक्ष द्यायला वेळच नव्हता म्हणून ते पूर्णपणे आजीच्या देखरेखेखाली होते. ते मोठे झाल्यावर त्यांना आजोबांनी त्यांच्याच एका कंपनीत नोकरी दिली. एक-दोनदा स्वतंत्र बिझनेसही काढून द्यायचा प्रयत्न केला. पण माझ्या वडिलांना काहीच जमले नाही. आजोबांचे पाणी त्यांच्यात नव्हतेच. ‘आता माझी सगळी भिस्त नातवंडावर त्यानं काही नवं केलं नाही तरी चालेल. नुसतं आहे ते सांभाळलं पाहिजे.’ असे आजोबांनी एकदा माझ्या आईला निराशेने म्हटले होते म्हणे. आजोबांनी माझ्या वडिलांचे लग्न जवळजवळ स्वतःच ठरविलं. माझी आई दिसायला सुंदर व मध्यमवर्गीयांपैकी होती. तिला व वडिलांना आजीने जवळच घर घेऊन दिलं. माझ्या आईला लागोपाठ तीन मुलगे व दोन मुली झाल्या. आजोबा तिच्यावर खूष होते. खूप नातवंडं आपल्याला तिच्याकरवी व्हावी ह्यापलीकडे आजोबांची तिच्याकडून काही अपेक्षा नव्हती. माझी आई कर्तबगार पण स्वभावाने गरीब आहे. आजीने तिचे कर्तुत्व पार दाबून टाकले. नातवंडे जवजवळ तिने स्वतःच वाढवली. त्यामुळे माझ्या सगळ्या मोठ्या भावंडांवर आजीची खोल छाप पडली आहे. माझ्या मोठ्या भावा-बहिणींना शिस्त हा प्रकार ठाऊकच नव्हता. कुठलीही वस्तू त्यांनी मागितली आणि आजीने दिली नाही असे घडलेच नाही. आई आजीपुढे हतबल ठरली. आणि तिला आपल्या मुलांवर ताबा ठेवता आला नाही.

“मी जन्मले तेव्हा मोठा भाऊ विशीला पोचला होता. त्याला दारूचे व्यसन तेव्हाच लागले होते. माझ्या जन्मापर्यंत आजी बरीच थकली होती. तेव्हा आईने स्वतः मला वाढवलं. मला समज येईतो माझी इतर भावंडंही हळूहळू जगावेगळ्या मार्गांनी वाटचाल करू लागली होती.

"वृद्ध आजोबांनी आपल्या मुलांची आणि नातवंडांची कुवत ओळखली होती. त्यांनी निवडक कर्तबगार व इमानी माणसांना आपले वेगवेगळे धंदे चालवायला ठेवले होते. इस्टेट ट्रस्टमध्ये ठेवली होती. व ह्या विश्वासू माणसांना, एका वकिलाला, बँकेला व माझ्या आईला इस्टेटीचे ट्रस्टी नेमले होते.

"आजी व आजोबा अगदी म्हातारे झाल्यावर एकदाच आम्ही सर्व बोटीने वेगवेगळ्या कॅरिबियन बेटांवर गेलो होतो तेव्हा मी सोळा वर्षाची होते. तिथे एक फ्रेंच वृद्ध माणूस आजोबांना भेटला. धंद्यात आर्थिक यश लाभले तरी आपल्या कौटुंबिक परिस्थितीमुळे आजोबा खचले होते. त्या माणसाशी आजोबांचे काही बोलणे झाले. मी जवळच उभी होते. आजोबा उठून गेल्यावर त्या माणसाने मला जवळ बोलावले, "तुझ्या आजोबांइतका यशस्वी आणि अयशस्वी माणूस मला आजवर भेटला नाही." तो म्हणाला, "गेले कित्येक दिवस मी तुझ्या आईवडिलांना, भावा-बहिणींना पाहतो आहे. ते सगळे आता हाताबाहेर गेलेले आहेत. एकच शेवटची आशा आहे. तू...."

"मी?" मी आश्चर्याने त्यांच्याकडे पाहत विचारले. त्यांच्या बोलण्याचा उलगडाच मला होत नव्हता.

"हे बघ मुली, माणसाला गरिबी, जुलूम, गुलामगिरी आजार वगैरे सर्व पचवता येते. पण गर्भश्रीमंती पचवता येत नाही." मी त्याच्याकडे आ वासून पाहत राहिले.

"गर्भश्रीमंतीची श्रीमंती सुरु झाल्यापासून तिसऱ्या किंवा चौथ्या पिढीत नायनाट होतो. त्यांच्या मुलांना व्यसने लागतात. त्यांची मने विकृत होतात. त्यांच्या आयुष्याला दिशा राहत नाही. त्यांना वाडवडिलोपार्जीत पैशाची किमंत वाटत नाही. ते पैसे उधळून टाकतात."

त्याने क्षणभर रोखून माझ्याकडे पहिले व म्हटले,

"तुझे आजोबा आतून जळताहेत. मुलगा व नातवंड अशी निघाल्याने बायकोला दोष देताहेत. पण ती त्यांच्या बायकोची चूक नाही. तो अतिश्रीमंतीच्या कुटुंबाला दिलेला शाप आहे." त्याने माझ्यावर काही परिणाम झालाय का हे परत एकदा पहिले. आणि तो डुलक्या काढू लागला.

"मी तेव्हा मनात त्याला हसले पण त्याच्या व्यक्तव्याचा माझ्या मनावर खोल ठसा उमटला व जसजसे दिवस उलटू लागले तसे तसे त्याच्या बोलण्यातले सत्य माझ्यापुढे माझ्या वडिलांच्या, भावंडांच्या रूपाने साकार होऊ लागले. मला तो 'शेवटची आशा' का म्हणाला ते हळूहळू उमजले.

"मी शाळेत जोमाने अभ्यास करायला सुरवात केली. सुट्टीत मुद्दाम कमी पगाराच्या नोकऱ्या केल्या. पैसे मिळवायला सर्वसाधारण कसे श्रम पडतात हे मला समजले. शाळा संपवून मी हॉवर्ड बिझनेस स्कूलला जायचे असे ठरवून हॉवर्डमध्ये ॲडमिशनचा अर्ज केला. मला ॲडमिशन मिळाली हे ऐकताच आजोबांना झालेला हर्षवायू मी कधीच विसरणार नाही. त्यानंतर दोन वर्षे त्यांनी मला हळूहळू आपल्या धंद्याची ओळख करून दिली. त्यातल्या खाचाखोचा शिकवल्या. मग ते माझ्यावर काम सोपवू लागले. हळूहळू मला इस्टेटीची बरीच माहिती झाली. आजोबांचा माझ्यावर विश्वास बसला. त्यांनी मला प्रमुख ट्रस्टी म्हणून नेमले. मी लग्न करीन.

मला मुलं होतील त्यांच्या करवी आपला वंश चालू राहील ही आशा नव्याने त्यांच्या मनात उत्पन्न झाली. ते माझ्या लग्नाची वाट पाहत तग धरून दिवस काढू लागले. आजोबांची अपेक्षा पूर्ण करायची असा मी निश्चय केला.

“पुढे मला कॉलेजात टेड भेटला. त्या फ्रेंच माणसाच्या भविष्याची मला इतकी जबरदस्त भीती बसली होती की माझ्या मुलांना मी सर्वसामान्य मुलांप्रमाणे वाढवायचं ठरविलं. ती माझ्या भावंडांप्रमाणे निपजतील ही मला भीती होती. मी टेडपासून त्याला ‘मी अनाथ आहे’ असे सांगून आतापर्यंत माझी श्रीमंती लपविली. आजोबांना मी टेडशी लग्न केल्याचं सांगितलं. त्यांनी एकदा बाहेरून आमचं घरही पाहिलं. माझ्या मोठ्या मुलांचा बॉबचा जन्म झाल्यावर एकदा न्यूयॉर्कला जाऊन त्यांना मुलाला दाखवलं. नंतर दोन वर्षांनी आजी व आजोबा वारले. मरण्यापूर्वी “तुझ्या मुलांकरवी माझा वंश चालू राहील ही मला खात्री आहे. तू मला मोठं समाधान दिलं आहेस” असं त्यांनी मला सांगितलं.

‘आजोबा गेल्यावर माझी आई इस्टेट सांभाळू लागली. ती हुशार आहे. तिला बरीच माहिती झालेलीच होती. त्यामुळे इस्टेटीचं बरंच काम ती करायची. मला मधून मधून बॉस्टनला भेटायची. आम्ही इथल्या एका बँकेत भेटायची व्यवस्था केली. आजोबांच्या हाताखाली तयार झालेले मदतनीस होतेच व अजूनही आहेत. त्यामुळे मी अगदी थोडक्या वेळात इस्टेटीचं काम आवरू शकत होते. परंतु गेल्या पाच वर्षापूर्वी आई आजारी झाली. सिगरेट ओढून तिला एंफिसिमा झाला आहे. तिला बॉस्टनला यायला जमेना. शेवटी तिला काहीच करता येईनासं झाल्यावर सगळं काम माझ्यावरच पडलं.”

“तुझे वडील कुठं आहेत?” मी हळूच विचारले.

“ते कुठे तरी फ्लॉरिडाला आहेत. आजोबा मरण्याचीच ते वाट पाहत होते. आजोबा गेल्याबरोबर वडिलांनी आईशी घटस्फोट घेतला. आपल्याला इस्टेट सांभाळायला द्यायची सोडून बायकोला दिली म्हणून त्याचा आजोबांवर फार राग आहे. त्यांनी फ्लॉरिडाला दुसरं लग्न केलंय म्हणे. कित्येक वर्षे आमची भेट नाही. “

“हे सगळे आपला खर्च तरी कसा चालावतात?” मी मूर्खासारखा प्रश्न विचारला.

“इस्टेटीतून प्रत्येकाला तनखा मिळतो. आजोबांनी तशी व्यवस्था केली आहे. मी माझा तनखा घेत नाही. फार जरुरी पडली तरच त्यातले पैसे घेते” मॉनिकाने उत्तर दिले.

“परवा आपण न्यूयॉर्कला गेलो होतो तेव्हा आपल्यावर टेडने डिटेक्टिव्हतर्फे पाळत ठेवली होती. माझ्या न्यूयॉर्कच्या घरात मला शिरतानाच गेल्या आठवड्यात टेडच्या मित्राने पाहिले होते. तेव्हापासून टेडने माझ्यावर पाळत ठेवायची व्यवस्था केली होती. तो व संजय आधीच एअरपोर्टवर थांबले होते. आपण एअरपोर्टच्या दिशेने जाऊ लागताच त्यांनी ताबडतोब विमान पकडलं व ते न्यूयॉर्कच्या घरासमोर येऊन एका कारमध्ये थोड्या अंतरावरच बसून राहिले होते.“

“संजयने हे मला सगळं रात्री सांगितलं. अगदी सिनेमाच्या गोष्टीसारखंच वाटलं मला !” मी नकळत बोलून गेले.

“सिनेमाच आहे हा, माझ्या आयुष्याचा !” मॉनिका म्हणाली.

नंतर दोन तीन महिने सगळे व्यवहार नेहमीप्रमाणेच चालू राहिले. एका रात्री टेड संजयला भेटायला एकटाच आला. बराच वेळ मागच्या पोर्चवर बसून ते बोलत होते.

आत आल्यावर संजयने खुलासा केला. “आम्ही बिझनेसच्या शेख महमंदी गप्पा मारत होतो ना त्या खऱ्या होणार आहेत. टेड मॉनिकाकडून पैसे घेऊन बिझनेस सुरु करणार आहे. मला पार्टनर म्हणून घ्यायचं असं ठरवलंय त्यानं. मॉनिकाला पैसे द्यायचे नाहीत पण आम्हाला थोडी मदत करायला ती कबूल झालीय. शिवाय टेडला इथं रहायचं नाही आता. त्याला श्रीमंत लोक राहतात त्या सबर्बमध्ये राहायला जायचंय. तिथं शाळा पण चांगल्या असतात. एवढे पैसे असताना ह्या कमी प्रतीच्या सबर्बमध्ये का रहायचं असं त्याला वाटतयं.”

“पैसे त्याचे नाहीत, मॉनिकाचे आहेत. तिला ते द्यायचे असते तर तिने केव्हाच तुम्हाला बिझनेस काढून दिला असता. आता टेडला तिच्या पैशाविषयी कळलं म्हणून तो तिच्यावर जबरदस्ती करून पैसे मागत असेल. म्हणून ती कबूल झाली असेल. पण तिची मनापासून पैसे द्यायला संमती नाही. ती आणि टेड काय हवं ते करू दे. पण तू तिच्याकडून पैसे घेऊन बिझनेस सुरु करण्याच्या मी अगदी विरुद्ध आहे.” मी ठासून संजयला सांगितलं.

“मॉनिकाला बिझनेसचं काय कळतंय?” संजय चिडला, “माझं भलं झालेलं बघवत नाहीय.”

“मॉनिका लाखो डॉलर्सच्या इस्टेटीची ट्रस्टी आहे. बिझनेस ग्रॅज्युएट आहे. तिच्या पुढं तुम्ही दोघं किस झाड की पत्ती ! तुम्हाला पैसे द्यायला ती तयार नसली तर तुमची लायकी नाही हेच कारण !” मी पण आता चिडले.

“मॉनिका श्रीमंत बापाच्या पोटी जन्माला आली आणि नशिबाने मोठ्या इस्टेटीची ट्रस्टी झाली. त्यात कर्तृत्वाचा संबंध आलाच कुठं?” संजय रागारागानं ओरडला.

ह्या संभाषणानंतर संजयचं आणि माझं मोठ्ठ भांडण झालं. त्या रात्री मी मॉनिका घर सोडून जाईल म्हणून व भांडणामुळे खूप रडले.

(क्रमश:)

**ललिता गंडभीर**

पूर्वप्रसिद्धी : माहेर, ऑगस्ट १९८६ .
तारेवरची कसरत, विद्या प्रकाशन, जून १९८७.